SUPPLEMENT

TO THE

BOMBAY GOVERNMENT GAZETTE.

Published by Authority.

THURSDAY, 13TH MARCH 1862.

PROCEEDINGS OF THE LEGISLATIVE DEPARTMENT, BOMBAY.

THE following extract from the Proceedings of His Excellency the Governor of Bombay in Council, assembled for the purpose of making Laws and Regulations, is hereby published for the information of all whom it may concern :—

Saturday, 8th March 1862.

The Council of the Governor of Bombay, for the purpose of making Laws and Regulations, met according to adjournment.

PRESENT:—

THE HONORABLE MR. REEVES,
THE HONORABLE MR. FRERE,
THE HONORABLE MR. TRISTRAM,
THE HONORABLE MR. RUSTOMJEE JAMSETJEE JEJEEBHOY,
THE HONORABLE MR. JUGGONATH SUNKERSETT,
THE HONORABLE MR. PREMABHAI HEMABHAI,
THE HONORABLE MR. MADHOOROW VITTUL VINCHOORKUR,
THE HONORABLE MR. ELLIS,
THE HONORABLE MR. SCOTT,
And the DEPUTY SECRETARY.

Mr. REEVES being the Senior Ordinary Member of Council present, presided in the absence of the Governor.

Mr. BARROW HELBERT ELLIS and Mr. MICHAEL HUGH SCOTT having been appointed additional Members of the Council of the Governor of Bombay for the purpose of making Laws and Regulations, took the usual affirmations.

The PRESIDENT said that the first subject was to consider the Report of the Select Committee upon " a Bill for regulating the Establishment of Markets."

The Committee had reported, and he requested the Deputy Secretary to read the Report.

The Deputy Secretary read the following Report:—

Report of the Select Committee appointed to consider and report on " A Bill for regulating the Establishment of Markets."

"The Committee having considered the Bill, beg to suggest the following amendments:—

That the words " and Fairs" be added to the Title of the Bill, and the words " or Fairs" be inserted after the word " Markets" wherever it occurs in the Preamble of the Bill, and the words " or Fair" after the word " Market" wherever it occurs in the Bill.

That the words " or in default of payment to imprisonment without hard labor for any period not exceeding two calendar months" be added at the end of the first Section of the Bill.

That the word " under" be substituted for " in" in the last line but one of Section IV. of the Bill.

That the words " within six weeks" be inserted between the words " shall" and " be" in the second line of Section VI. of the Bill.

That the words " disobey or oppose" be inserted between the words " contravene" and " any" in the second line of Section VII. of the Bill, and the word " final" between the words " any" and " order" in the same line of the same Section, and that the following be added at the end of the Section " or in default of payment to imprisonment with or without hard labor for any period not exceeding two calendar months."

That Section VIII. of the Bill as printed be omitted, and the following substituted:—

VIII. This Act shall not extend to the Islands of Bombay and Colaba.

That the following Section be added as Section IX. :—

IX. Nothing in this Act shall be held to apply to assemblages of people collected at or concerned in the inauguration of sacred edifices, or collected at or concerned in any other religious festivals or ceremonies."

The President said that the Bill should be considered Section by Section.

Section I. was then read.

Mr. Frere suggested that " simple imprisonment" should be substituted for " imprisonment without hard labor."

Agreed to.

Section II. was then read.

Mr. Ellis said he should prefer that the application referred to in the Section should be made to " a Magistrate" and not to " the Magistrate."

He moved that the words " of the District" be inserted after the word " Magistrate" in the 4th line.

Agreed to.

Section III. was then read.

Mr. Ellis asked why the limits of 4 miles were fixed.

The President said that Fairs were held in some places every day in the week, and it was desirable to have some limit.

Mr. Madhoorow Vittul Vinchoorkur moved by way of amendment that the words at the conclusion of the Section " and served at the expense of the applicant" be omitted.

The opinion of the Council was then taken, and 8 being in favour of the retention of the words, and 1 for their omission, the amendment was lost.

Clause 3 was then agreed to.

Clause 4 was then read.

Mr. Ellis proposed the insertion of the words "of the District" after the word "Magistrate" in the 5th, 6th, and 9th lines.

Agreed to.

Clause 5 was then read.

Mr. Ellis proposed the insertion of the words "of the District" after the word "Magistrate" in the 15th and 16th lines.

Agreed to.

Clause 6 was then read.

Mr. Ellis asked whether it was intended to give an appeal to the Government.

Mr. Frere thought it better to strike out the words "subject to the control of the Local Government."

Agreed to.

The Clause, as thus amended, was then agreed to.

Clause 7 was then read.

Mr. Ellis proposed the omission of the word "final" in the 3rd line.

Agreed to.

Mr. Frere proposed the substitution of the words "of either kind" for the words "with or without hard labour."

Agreed to.

Clause 8 was then read.

Agreed to.

Clause 9 was then read.

The President said this Section was introduced at the suggestion of his colleagues Mr. Juggonath Sunkersett and the Nawab of Savanoor.

Mr. Frere had no objection to the words "in the inauguration of sacred edifices," but he thought that the Magistrate's sanction should be obtained for any large assemblages of persons at religious festivals or ceremonies which were proposed after the 1st year.

Mr. Ellis said all fairs were religious.

Mr. Frere said the difficulty might be obviated by inserting the words "not forming a part of a fair or market."

Mr. Tristram put the question whether the Section should remain as amended by the Committee, or whether the words "not forming a part of a fair or market" should be added.

The majority of the Council being in favour of the addition of the words, the Clause, with the above additional words, was agreed to.

Mr. Frere proposed the addition of the following Clauses:—

X. Nothing in this Act should be held to restrict the general powers of Government to control the orders of the Magistrate or Commissioner of Police in regard to markets or fairs.

Carried.

XI. The word "Magistrate" when used alone, without the addition of the words "of the District," includes every officer authorised to exercise the full powers of the Magistrate.

Carried.

The PRESIDENT moved that the Bill be read a second time and passed.

Mr. JUGGONATH SUNKERSETT said that people have had no opportunity of considering the Bill. The report of the Select Committee had only been read to-day. He begged to move as an amendment that the Bill be read a second time this day week.

The PRESIDENT then said that in that case he would not put the motion that the Bill be now read a second time and passed, but instead thereof he would put the question that the Bill be read a second time this day week.

Carried.

The PRESIDENT said the next subject was to consider the report of the Select Committee upon "a Bill for the preservation of the Bhagdaree Tenure."

The DEPUTY SECRETARY read the following Report:—

"The Committee having considered the Bill, beg to suggest that it be extended to the Nurwadaree Villages, and that the wording of the Bill be amended as follows:—

Draft.

Whereas it has been found that the permanence of the tenures, known as the Bhagdaree and Nurwadaree tenures which have existed from time immemorial in certain parts of the Presidency of Bombay, is endangered by the increasing practice of attachment and sale by civil process of the homesteads and building sites ("Gubhan") appertaining or appendant to the constituted Bhags or the recognised sub-divisions of such Bhags or Shares in Bhagdaree or Nurwadaree Villages; It is therefore enacted as follows:—

I. No portion of a Bhag or Share in any Bhagdaree or Nurwadaree Village other than a recognised sub-division of such Bhag or Share shall, from and after the passing of this Act, be liable to seizure, sequestration, attachment, or sale by the process of any Civil Court, and no process of such Court shall be enforced so as to cause the dismemberment from any such Bhag or Share or recognized sub-division thereof of any homestead, building site (Gubhan), or premises forming an integral part thereof.

II. Whenever any process has issued out of any Civil Court for the seizure, sequestration, attachment, or sale of any portion of a Bhag or Share in any Bhagdaree or Nurwadaree Village other than a recognized sub-division of such Bhag or Share, or for the seizure, sequestration, attachment, or sale of any homestead building site (Gubhan), or premises forming an integral part thereof, it shall be lawful for the Collector of the District in which any such Bhagdaree or Nurwadaree Village is situated, although not a litigating party, to move in such Civil Court that such process should be set aside or quashed, and that the provision of this Act be put in force; and if such Court be of opinion, on the evidence adduced by the Collector on such motion, that the case is one falling within this Act, it shall set aside or quash such process; and it is hereby further enacted that any order which the said Court may make on such motion shall be appealable in the same manner as a decree of the Court in which it is made.

III. And it is hereby further declared that nothing in this Act contained shall be construed as prohibiting the issue and execution of any such process as aforesaid against any Bhag or Share or recognised sub-division of any Bhag or Share in any such Village as aforesaid, together with its homestead, building site (Gubhan), and other proper appurtenances if the issue and execution of such process be in other respects authorised by law.

Mr. FRERE said that after the meeting of the Select Committee, it occurred to Mr. Westropp, who was unable to attend to-day, that several alterations should be made in the Bill. Mr. Westropp had also added two new Clauses; and it appeared to Mr. Frere that, as the Bill was thus nearly recast, it would be desirable to refer the Bill back to the same Select Committee.

Agreed to.

The PRESIDENT said that the third subject for consideration was a "Bill for the Restoration of the Grassias in the Ahmedabad Collectorate, and for their relief from debt."

The PRESIDENT made the following remarks:—

In the Ahmedabad Collectorate of Guzerat there is a class of Landholders called Talookdars, really "Grassias," whose estates are situated in the Dholka, Veerungaum, Purantej, and Dundooka Districts. Most of these "Grassias" are Rajpoots, some are Mehwassees, *i. e.* Colies, and others. There is no doubt that they are sprung from an ancient race of hereditary proprietors who were found by the Moguls at their first appearance in Guzerat, possessed of considerable power and wealth. The Moguls managed to expel the whole of them from their estates, but on a stubborn resistance being made, they felt themselves obliged to restore to the Grassias in the immediate vicinity of the Capital, Ahmedabad, a portion of their lands which is held to this day rent-free as "Wanta;" while to those situated more remote from the Capital, and whose resistance was still more resolute, restoration of their lands was made in full, burdened, however, with the obligation of paying tribute. This tribute, which was annual, amounted to about half the net revenue of each estate, and was payable in cash. It nowhere appears that the estates were burdened in any other manner. And thus the Grassias were settled by the Moguls as actual proprietors of their estates, with the simple liability of paying tribute to the Government.

The accession and dominion of the Mahrattas effected no difference whatever in the tenure of the Grassias, though the annual payments varied under their administration; but, although less than half the net revenue was sometimes taken by what was called Moolukgeeree, we find no record of the exaction of any more than one half.

For some time after their acquisition of Guzerat from the Mahrattas, the British Government continued to realize annual payments according to past years. But it would appear that very soon the nature of the payments was altered: instead of tribute, the Government assumed it to be Rent or Revenue they were collecting. A significant change this, which ought to be borne mind, for it had an all important effect on the conditions of the Grassias. Besides this, about the year 1821 an increase was made to the yearly rentals about 50 per cent, and this, as may be supposed, constituted a burden on the Grassia Chiefs, such as men accustomed to a free style of living, and who were at best inapt financiers, very soon found to be insupportable. They were obliged, nevertheless, to submit as they best could, and the consequence was that they fell into pecuniary embarrassment, and so became impoverished and needy.

The Honorable Mr. Elphinstone subsequently introduced annual leases, and also fixed the payments at 70 per cent. of the produce; but it is obvious that this large share, which was exacted without remissions of any kind, barely admitted of a livelihood to the Grassias, and could not arrest the ill effects of previous mistakes and oppressive treatment. The impoverishment of these landholders has therefore continued to this day, and we now find a number of them sunk into a state of irretrievable poverty; their estates have passed from them. Others are so far gone, that their restoration also to competency is hopeless, unless Government come to their aid in some very effectual manner to remedy the mischief produced by their own grievous errors.

Since the time of Mr. Elphinstone, it has been frequently declared, and that too on the authority of the Legal Remembrancer, that the tenure of the Grassia or Talookdar is that of a hereditary Leaseholder dependent on the pleasure of Government.

The President then read extracts from the records of Government illustrative of this statement.

Legal Remembrancer to Government, No. 123 of 1855.

"I. There is no such thing as the Talookdaree 'tenure' as distinct from the provisions of the Talookdaree leases. The mutual rights of the Talookdars and the Government can only be determined by looking at the terms of the lease.

Legal Remembrancer to Government, No. 43 of 1855.

"II. By the usage of the country there may be right in the Talookdar to have his lease renewed, or rather to have a lease for a further period granted to him; but as Government can practically evade this by introducing any stipulations it pleases, the right to the lease obviously could not be enforced as a legal right.

Legal Remembrancer to Goment, No. 123 of 1855.

"III. Under the stringest provisions of the Cases, Government can always protect themselves by annulling the lease, and resuming the village immediately on its being attached.

Resolution of Government, No. 3455 of 1855.

"IV. Government might in this case (Leea), without waiving their undoubted right to determine whom they will admit to hold the lease of the village as Talookdar, permit, &c.

Legal Remembrancer to Government, No. 124 of 1855.

"V. The legal right of Talookdars are defined by their lease, the provisions of which are so stringent as to make the Talookdar little better than a tenant-at-will of Government."

He then proceeded ;—

I must here observe that the annual leases are of the most stringent character, as may be readily seen by inspection.

We have thus seen the ancient chief, actual proprietor of his domain, and once powerful enough to resist Mogul invasion of his rights sword in hand, converted by British mismanagement, founded on error, but not the less most unrighteous, into an annual leaseholder or mere tenant-at-will of Government, and reduced to extreme degradation.

On every principle of justice I say, the British Government is bound to do its utmost to restore these Chiefs, so for as it is possible so to do, to the position in which they were found at the cession of the Ahmedabad Districts by the Mahrattas,—a position, be it remembered, in which the Grassias of the neighbouring district of Kattyawar, of the same race and, only separated from their more unfortunate fellows by accident, are at this moment to be seen.

After anxious consideration, the Bombay Government has now acknowledged this obligation, and has come to the conclusion that nothing short of legislation will suffice to apply the necessary remedy. The Bill before the Council contains the measures which it is proposed to adopt to enable Government to discharge its duty effectually.

The creditors of the impoverished Chiefs, with whose estates it is now proposed to deal, oppose all attempts at amicable and reasonable compromise. They will generally, or with few exceptions, be satisfied with nothing that shall leave their debtors any property but their rags ; and anything like a Bankruptcy process will fall short therefore of the necessities of the case. If the Talookdar were unembarrassed, we might at once recant our misinterpretations of his tenure, declare him proprietor, and lower his tax, and there would be an end of the matter. But to declare him a proprietor under existing circumstances would be merely to enable his creditors to sell his whole estate from under him by process of the Civil Court, which hitherto has not had a lien on it. We cannot leave the Talookdar thus unprotected. We have therefore decided on bringing forward a strong measure, that of suspending the jurisdiction of the Civil Courts, so far as the Talookdar estates and their proprietors are concerned, for a period sufficient to admit of the usurious liabilities of the Chiefs being inquired into, dealt with on equitable principles, and liquidated. I am in hopes that the Honorable Members will concur in considering this measure not a whit stronger than is absolutely necessary. It really amounts to nothing more than the establishment of a kind of Chancery in behalf of men who, as they have been subjected to exceptional injustice, are certainly entitled to demand restitution by some exceptional legislative authority.

It will further be seen that one provision of the Bill is to guarantee to the Talookdar those proprietary rights which have been so long withheld by Government. It is further contemplated, though not provided for in the Bill, to concede more liberal terms to the recognised proprietor in the matter of taxation.

The PRESIDENT then moved that the Bill be read a first time, and be referred to a Select Committee, composed of the

CHIEF SECRETARY or the ACTING CHIEF SECRETARY TO GOVERNMENT,
MR. WESTROPP, and
MR. PREMABHAI HEMABHAI.

The Committee to report progress this day week.

Agreed to.

The Deputy Secretary read the Bill:—

A Bill for the restoration of the Grassias in the Ahmedabad Collectorate, and for their Relief for Debt.

Whereas the lands held in the Zillah of Ahmedabad, in the Province of Guzerat, under the title of Talookdaree Estates, are only held on leasehold tenure determinable at the pleasure of Government; and whereas it has been brought to the notice of Government that many of the holders of these Estates have borrowed money on the security of their Estates, which, under the aforesaid tenure, is no good security; and whereas it is expedient to enable the Talookdars to disencumber themselves of their debts, which cannot be effected under the Laws and Regulations in force for the liquidation of debt and the process of the Civil Courts.

It is hereby enacted that, from and after the   day of   186   the said Talookdaree Estates in the Zillah of Ahmedabad, Province of Guzerat, being those which are enumerated in the Schedule appended to this Act, shall not be liable, during a period of twenty years, to any of the processes of the Civil Courts which are in force under the Laws and Regulations of the Bombay Presidency for the satisfaction of debt.

And it is hereby enacted that from and after the   day of   186   all Suits arising out of claims on the land or landed revenue of the said Talookdars which may be pending before any of the Civil Courts established in the said Zillah or before the Court of Sudder Adawlut shall be transferred for settlement to such Officer or Officers as may be appointed by the Governor in Council to the duty hereinafter to be described.

And it is further enacted that from and after the   day of   186   the Government of Bombay do acknowledge and declare that the said Talookdars being hereditary incumbents of the Estates aforesaid have full proprietary rights over the said Estates as regards succession to and possession, management, and transfer of the same, subject to such land tax as the Governor in Council may be pleased to reserve and to the further provisions of this Act.

Whenever it shall have been ascertained that the encumbrances on any one of the said Estates are equal to or exceed ten times the average profit derived by the Talookdar from the said Estate during the previous five years, the management of the said Estate shall become vested in an Officer or Officers who shall be specially appointed by the Governor in Council, and such Officer or Officers shall, during the continuance of their management of the Estate, receive the whole of the profits, rents, and payments of every kind that would otherwise be payable to the Talookdar, and shall pay to the Talookdar such annual sum only as shall appear to the Governor in Council requisite for his decent support.

All arrangements and orders for the management of the revenue of such Estate which shall be devised and made by the Officer or Officers appointed as above described, shall be obeyed by all persons concerned, and the said Officer or Officers shall prepare a Schedule of all liabilities *boná fide* incurred by the Talookdar, and shall make arrangement for the settlement and liquidation of them in accordance with rules laid down by the Governor in Council to be called " Rules for the management of encumbered Talookdaree Estates," and it shall be lawful for the Governor in Council to add to and alter such rules from time to time as necessity may arise.

It shall be competent to the Officer or Officers aforesaid with the sanction of the Governor in Council to raise a fund to be applied to the liquidation of the debts of an encumbered Talookdaree Estate under their management by assigning a portion of such Estate to be held and enjoyed for a limited period by any fit person who may advance money on the security of the Estate or by the sale of such portion of the Estate as may appear expedient, but in either case the consent of the Talookdar and of his next heir, if the latter be of age, shall first be obtained.

The entire scheme for the disencumberment of each Talookdaree Estate shall, as soon as completed, be submitted to the Governor in Council for approval, and on such approval being obtained, shall then and not till then be carried into execution with the same effect as a decree of a Civil Court.

It is hereby declared that during the period when an Estate shall be under the control and management of an Officer or Officers appointed as above described, for the purpose of settling and liquidating the debts and encumbrances thereof, it shall not be competent to any Talookdar, being its proprietor, to incur any fresh liabilities on the security of the land or the revenues of such Estate or to alienate any portion of them, and a public Notification shall be made to this effect at the commencement of every settlement.

The PRESIDENT then adjourned the Meeting to Saturday the 15th March at 11 o'clock.

By order of His Excellency the Governor in Council,

LYTTELTON H. BAYLEY,

Deputy Secretary to Government.

Bombay Castle, 8th March 1862.

मुंबई येथील लेजिस्लेटिव डिपार्टमेंटाचें प्रोसिडिंग.

कायदे व कानूं करण्यासाठीं बंदेगान आलीनवाब मुस्तताब हजरत आनरबल् गवरनर साहेब बाहादूर जंजिर मुंबई यांचें कौन्सिल भरलें होतें त्यावेळीं काम चाललें त्यांतील खालीं लिहिलेला उतारा सर्वांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला आहे.

तारीख ८वी माहे मार्च सन१८६२.

कायदे व कानूं करण्यासाठीं मुंबईचे गवरनर साहेबांचे कौन्सिलाची सभा आजच्या दिवसापर्यंत तहकूब केली होती त्याप्रमाणें आज पुनः भरली.

हजर.

आनरबल् रीवज् साहेब.
आनरबल् फ्रीयर साहेब.
आनरबल् ट्रिस्ट्राम साहेब.
आनरबल् रस्तमजी जमसेटजी जीजीभाई साहेब.
आनरबल् जगंनाथ शंकरशेट साहेब.
आनरबल् शेट प्रेमाभाई हेमाभाई.
आनरबल् राव बाहादूर माधवराव विठ्ठल विंचुरकर.
आनरबल् एलिस साहेब.
आनरबल् स्काट साहेब.
आणि डेपुटी सेक्रेटारी साहेब.

कौन्सिलाचे आर्डिनरी मेंबर हजर होते त्यांपैकीं आनरबल् रीवज् साहेब सिनियर असल्यामुळें ते, गवरनर साहेब आले नव्हते सबब प्रेसिडेन्ट झाले.

आनरबल् बारो हेल्बर्ट एलिस साहेब व आनरबल् मैकेल ह्यू स्काट साहेब यांस कायदे व कानूं करण्याविषयींचे मुंबईचे गवरनर साहेबांचे कौन्सिलाचे आडिशनल मेंबर नेमल्यावरून त्याणी मामुल प्रमाणे प्रतिज्ञा केल्या.

नंतर प्रेसिडेन्ट साहेब ह्मणाले कीं "बाजार स्थापण्याबद्दल नियम ठरविण्याविषयींचे आक्टाचे मसुद्याबाबद सिलेक्ट कमिटीने केलेले रिपोर्टाचा प्रथम विच्यार करणें आहे.

सिलेक्ट कमिटीनें रिपोर्ट केला आहे तो डेपुटी सेक्रेटारी साहेबानी वाचावा.

नंतर डेपुटी सेक्रेटारी साहेबानी रिपोर्ट वाचला तो येणे प्रमाणेः—

"बाजार स्थापण्याबाबद नियम ठरविण्याविषयींचे आक्टाचे मसुद्याच्या विच्यार करून रिपोर्ट करण्याविषयीं नेमलेले सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट."

सदर्हू आक्टाचे मसुद्याच्या विच्यार केल्यावरून कमिटीचे नजरेस असें येतें कीं

त्यांत खालीं लिहिल्या प्रमाणे फेरफार करावे. ते येणे प्रमाणेः–

मसुद्याचे सदरांत "आणि मेळे" हे शब्द वाढवावे; आणि मसुद्याचे उद्देशांत जेथें जेथें "बाजार" हा शब्द आहे तेथें तेथें त्या शब्दा पुढें "किंवा मेळे" हे शब्द घालावे. आणि मसुद्यांत "बाजार" हा शब्द जेथें जेथें आहे तेथे तेथे त्या शब्दा पुढें "किंवा मेळे" हे शब्द घालावे.

"किंवा न दिला तर पराकाष्ठा दोन क्यालेंडर महिने पर्यंत सक्त मजुरीनिशीं किंवा सक्त मजुरी वांचून कैदेचे शिक्षेस" हे शब्द मसुद्याचे पहिले कलमाचे शेवटीं वाढवावे.

मसुद्याचे ४थे कलमाचे शेवटापासून दुसरे ओळींत "अंडर" हा शब्द आहे त्या शब्दा बद्दल "इन्" हा शब्द घालावा.

मसुद्याचे ६वे कलमाचे २रे ओळींत "शाल" व "बी" या शब्दां मध्यें "सिक्स विइक्स हे शब्द घालावे.

मसुद्याचे ७वे कलमाचे २रे ओळींत "विरुद्ध" व "कोणतेही" या शब्दां मध्यें "अमान्य करील किंवा हरकत करील" हे शब्द घालावे. आणि त्याच कलमाचे त्याच ओळींत "कोणताही" व "हुकूम" या शब्दां मध्यें "आखरचा" हा शब्द घालावा आणि "किंवा न दिला तर पराकाष्ठा दोन क्यालेंडर महिने पर्यंत सक्त मजुरी निशीं किंवा सक्त मजुरी वांचून कैदेचे शिक्षेस" हे शब्द त्याच कलमाचे शेवटीं वाढवावे.

मसुद्याचें ८वें कलम छापलें आहे तें काढून टाकून त्या बद्दल खालीं लिहिलेलें कलम दाखल करावें.

८ हा आक्ट मुंबईचे व कुलाब्याचे टापूस लागू नाहीं असें समजावें.

खालीं लिहिलेलें कलम ९वें कलम ह्मणून वाढवावें.

९ धर्मसंबंधी इमारतीचे संस्काराचे वेळीं जमलेले लोकांचे मेळ्यांस किंवा त्या संस्काराचे कामांत संबंध असणारे लोकांचे मेळ्यांस अथवा धर्मसंबंधी इतर सणाचे वेळीं किंवा क्रियेचे वेळीं जमलेले लोकांचे मेळ्यांस किंवा त्यांत संबंध असणारे लोकांचे मेळ्यांस या आक्टांतील कोणताही ठराव लागू आहे असें समजूं नये.

प्रेसिडेंट साहेब ह्मणाले कीं या मसुद्याचे एक एक कलमाचा विच्यार करावा.

नंतर पहिलें कलम वाचलें.

तेव्हां आनरबल् फ्रीयर साहेब ह्मणाले कीं "सक्त मजुरीवांचून कैदेची शिक्षा" या शब्दा-बद्दल "नुस्ते कैदेची शिक्षा" हे शब्द घालावे.

ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

नंतर दुसरें कलम वाचलें.

तेव्हां आनरबल् एलिस साहेब ह्मणाले कीं या कलमांत अर्ज करण्याविषयीं लिहिलें आहे तो अर्ज "अमुकच माजिस्ट्रेटास" करण्या बद्दल "कोणतेही माजिस्ट्रेटास" करावा असें असावें हें आह्मास चांगलें वाटतें.

आणि ४थे ओळींत " माजिस्ट्रेट " या शब्दानंतर "जिल्ह्याचा" हा शब्द घालावा.

ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

नंतर ३रें कलम वाचलें.

तेव्हां आनरबल् एलिस साहेबानी विच्यारलें कीं ४ मैलांची हद्द कां ठरविली आहे.

प्रेसिडेन्ट साहेब ह्मणाले कीं कांहीं ठिकाणीं दर वारास बाजार भरतात यास्तव हरकत दूर होण्यासाठीं कांहीं हद्द ठरविणें योग्य आहे.

आनरबल् राव बाहादूर माधवराव विठ्ठल विंचुरकर ह्मणाले कीं "अर्जदाराचे खर्चीने पोंचवावी " हे शब्द कलमाचे शेवटीं आहेत ते काढून टाकावे.

नंतर या गोष्टीविषयीं कौन्सिलाचें अनुमत घेतलें तेव्हां ते शब्द ठेवण्याविषयीं आठ अनुमतें पडलीं आणि काढून टाकण्याविषयीं एक अनुमत पडलें त्यामुळें ती गोष्ट नाकबूल झाली.

रकम ३री सर्वांनी कबूल केली.

नंतर ४थी रकम वाचली. तेव्हां आनरबल् एलिस साहेब ह्मणाले कीं ५वे व ६वे व ९वे ओळींत " माजिस्ट्रेट" या शब्दा पुढें "जिल्ह्याचा" हा शब्द घालावा.

ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

नंतर ५वी रकम वाचली- तेव्हां आनरबल् एलिस साहेब ह्मणाले कीं १५वे व १६वे ओळींत " माजिस्ट्रेट " या शब्दा पुढें " जिल्ह्याचा" हा शब्द घालावा.

ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

नंतर ६वी रकम वाचली- तेव्हां आनरबल् एलिस साहेब ह्मणाले कीं सरकारास अपील चालेल असा त्या कलमाचा इरादा आहे कीं नाहीं.

आनरबल् फ्रीयर साहेब ह्मणाले कीं "ठिकठिकाणचे सरकारचे मंजुरीने" हे शब्द काढून टाकले असतां ठीक पडेल.

ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

ही रकम सदर्हू प्रमाणे सुधारलेली सर्वांनी कबूल केली.

नंतर ७वी रकम वाचली- तेव्हां आनरबल् एलिस साहेब ह्मणाले कीं ३रे ओळींतील "आखरच्या" हा शब्द काढून टाकावा.

ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

मग आनरबल् फ्रीयर साहेब ह्मणाले कीं " सक्त मजुरीनिशीं किंवा सक्त मजुरी वांचून" या शब्दां बद्दल "दोहों प्रकारां पैकीं कोणत्याही एका प्रकारची" हे शब्द घालावे.

ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

नंतर ८ वी रकम वाचली.

ती सर्वांनी कबूल केली.

नंतर ९ वी रकम वाचली.-- तेव्हां प्रेसिडेंट साहेब ह्मणाले कीं हें कलम आनरबल जगंनाथ शंकरशेट साहेब व आनरबल सावनूरकर नवाब यांचे सांगण्यावरून घातलें आहे.

आनरबल फ्रीयर साहेब ह्मणाले कीं "धर्मसंबंधी इमारतीचे संस्काराचे वेळीं" या शब्दांबाबद आह्मास हरकत नाहीं परंतु १ ले वर्षानंतर धर्मसंबंधी सण किंवा क्रिया होण्याच्या असतील त्या वेळीं लोकांचे मेळे जमण्यासाठीं माजिस्ट्रेटाचें अनुमत घेतलें पाहिजे.

तेव्हां आनरबल एलिस साहेब ह्मणाले कीं सर्व मेळे धर्म संबंधींच आहेत.

यावर आनरबल फ्रीयर साहेब ह्मणाले कीं "मेळ्याचा किंवा बाजारचा भाग नसेल" हे शब्द घातल्याने अडचण दूर होईल.

नंतर आनरबल ट्रिस्ट्राम साहेबानी पुसलें कीं हें कलम कमिटीने सुधारलें आहे तसेंच ठेवावें किंवा "मेळ्यांचा किंवा बाजाराचा भाग नसेल" हे शब्द वाढवावे.

तेव्हां शब्द वाढविण्याविषयीं कौन्सिलापैकीं बहुतेकांचें अनुमत असल्यामुळें ती रकम सदहू ज्यास्ती शब्दां सुध्दां सर्व मतें कबूल झाली.

खालीं लिहिलेल्या रकमा वाढवाव्या असें आनरबल फ्रीयर साहेब ह्मणाले:--
"१० बाजाराबाबद किंवा मेळ्याबाबद माजिस्ट्रेटाने किंवा पोलिस कमिशनराने केलेले हुकुमांत दाखल करण्याचा सामान्य अधिकार सरकारास आहे त्या अधिकाराची इयत्ता या आक्टांतील कोणतेही ठरावावरून होते असें समजूं नये."

ही रकम सर्वमतें कबूल झाली.

"११ जिल्ह्याचा" या शब्दावांचून माजिस्ट्रेट या शब्दाचा मात्र उपयोग केला असेल तेव्हां माजिस्ट्रेट या शब्दांत, माजिस्ट्रेटाचे संपूर्ण अधिकार चालविण्याचा अखत्यार मिळालेले सर्व अंमलदारांचा समावेश होतो असें समजावें."

ही रकम सर्वमतें कबूल झाली.

नंतर प्रसिडेंट साहेब ह्मणाले कीं मसुदा दुसरे वेळीं वाचून कायम करावा.

तेव्हां आनरबल जगंनाथ शंकरशेट साहेब ह्मणाले कीं या मसुद्या विषयीं विच्यार करण्यास लोकांस वेळ सांपडला नाहीं. सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट आजच वाचला यास्तव आमचें असें ह्मणणें आहे कीं हा मसुदा आजपासून आठवे दिवशीं दुसरे वेळीं वाचावा.

यावर प्रेसिडेंट साहेब ह्मणाले कीं असें आहे तर मसुदा आतांच दुसरे वेळीं वाचून कायम करावा अशी आह्मी दरखास्त करीत नाहीं परंतु त्या बद्दल मसुदा आजपासून आठवे दिवशीं दुसरे वेळीं वाचावा अशी दरखास्त करितों.-- ही गोष्ट सर्वमतें कबूल झाली.

प्रेसिडेंट साहेब ह्मणाले कीं "भागदारी वहिवाट कायम ठेवण्याविषयींचे आक्टाचे मसुद्याबाबद सिलेक्ट कमिटीने केलेले रिपोर्टीचा आतां विच्यार करणें आहे.

नंतर डेपुटी सेक्रेटारी साहेबानी रिपोर्ट वाचला तो येणे प्रमाणेः—

भागदारी वहिवाट कायम ठेवण्याविषयींचे आक्टाचे मसुद्याचा विचार करून रिपोर्ट करण्याविषयीं नेमलेले सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट.

सदहू आक्टाचे मसुद्याचा विच्यार केल्यावरून कमिटीचे नजरेस असें येतें कीं हा आक्ट नरवादारी गांवांस लागू करावा व मसुद्यांत खालीं लिहिल्या प्रमाणे फेरफार करावे.

मसुदा.

भागदारी व नरवादारी वहिवाटी म्हणून ज्या वहिवाटी मुंबई प्रेसिडेन्सीचे कित्येक भागांत पूर्वापार चालत आल्या आहेत त्या खालीं लिहिलेले कारणामुळें कायम राहाणे कठीण आहेत म्हणजे भागदारी किंवा नरवादारी गावाचे भाग केले असतात त्यांतील किंवा त्या भागांचे पोटभाग मंजूर केले असतात त्यांतील घरठाणे व इमारतीच्या जागा म्हणजे गभाण दिवाणी कोर्टाचे हुकमावरून जप्त करून विकण्याची चाल चाहस चालली आहे त्यामुळें कायम राहाणे कठीण आहे असें नजरेस आलें आहे यास्तव खालीं लिहिल्या प्रमाणे ठरविलें आहे.

१. भागदारी किंवा नरवादारी गांवांतील भागाचा पोटभाग मंजूर केला असेल त्या खेरीज त्या भागाचा कोणताही इतर भाग हा आक्ट ठरल्या नंतर दिवाणी कोर्टाचे हुकमावरून जप्त होण्यास किंवा विकला जाण्यास पात्र नाहीं आणि कोणतेंही घरठाण किंवा इमारतीची जागा किंवा गभाण किंवा ठिकाण सदहू प्रकारचे ज्या भागांत किंवा मंजूर केलेले पोट भागांत असेल.तें त्या भागापासून किंवा पोटभागापासून वेगळें पडे असे रितीने सदहू प्रकारचे कोर्टाचा कोणताही हुकूम वजावूं नये.

२. कोणतेंही भागदारी किंवा नरवादारी गांवांतील भागाचा पोटभाग मंजूर केला असेल त्या खेरीज त्या भागाचा कोणताही इतर भाग जप्त करण्याविषयीं किंवा विकण्याविषयीं अथवा कोणतेंही घरठाण किंवा इमारतीची जागा किंवा गभाण किंवा ठिकाण सदहू प्रकारचे भागांत असेल तें जप्त करण्याविषयीं किंवा विकण्याविषयीं कोणतेही दिवाणी कोर्टातून हुकूम झाला असेल तेव्हां तो भागदारी किंवा नरवादारी गांव ज्या जिल्ह्यांत असेल त्या जिल्ह्याचा कलेक्टर मुकद्दम्यांतील पक्षकार नसेल तथापि त्यास सदहू प्रकारचे दिवाणी कोर्टास खालीं लिहिल्या प्रमाणे दरखास्त करण्याचा अधिकार आहे म्हणजे सदहू प्रकारचा हुकूम रद्द करून या आक्टांतील ठराव अंमलांत आणावे असी दरखास्त करण्याचा अधिकार आहे आणि मुकद्दम्यास हा आक्ट लागू आहे अशी सदहू प्रमाणे दरखास्त करतेवेळीं कलेक्टराने पुरावा हजर केला असेल त्यावरून कोर्टाचे नजरेस येईल तर त्या कोर्टाने सदहू प्रकारचा हुकूम रद्द करावा. आणि आणखी असें ठरविलें आहे कीं कोर्टाचे हुकूमनाम्यावर असें अपील चालतें तसेंच अपील सदहू प्रकारची दरखास्त झाली असतां सदहू प्रकारचें कोर्ट हुकूम करील त्या हुकूमावर चालेल.

३. आणि आणखी असें ठरविलें आहे कीं सदर्हू प्रकारचे कोणतेही गांवांतील भागांत किंवा त्या भागाचे पोट भाग मंजूर केले असतील त्यांत घरठाण व इमारतीची जागा व गभाण व इतर ठिकाणे असतील त्या सुद्धां त्या भागा बाबद किंवा पोट भागाबाबद सदर्हू प्रकारचा हुकूम देऊन तो अंमलांत आणण्याचा अधिकार इतर रीतीने कायद्यावरून असेल तर तसा हुकूम देऊन तो अंमलांत आणण्याची मनाई या आक्टांतील कोणतेही ठरावावरून होते असें समजूं नये.

आनरबल फ्रीयर साहेब म्हणाले कीं आनरबल वेस्त्राप साहेबांस आज येववत नाहीं परंतु त्यांस सिलेक्ट कमिटीचे सभे नंतर असें वाटलें कीं या मसुद्यांत किलेक फेरफार केले पाहिजेत. आनरबल वेस्त्राप साहेबानी दोन नव्या रकमाही वाढविल्या आहेत. आणि या प्रमाणे मसुदा बहुतकरून सगळा फिरला आहे याजकरितां तो त्याच सिलेक्ट कमिटीकडे पुनः सोंपावा हें योग्य आहे.

ही गोष्ट सर्व मतें कबूल झाली.

प्रेसिडेंट साहेब म्हणाले कीं आमदाबाद जिल्ह्यांतील गिराशिये लोकांची स्थिती पूर्ववत प्रमाणे करण्याविषयींचे व त्यांस कर्जांतून मुक्त करण्या विषयींचे आक्टाचा मसुदा हा विच्यार करण्याचा आतां ३ रा विषय आहे.

नंतर प्रेसिडेंट साहेबानी खालीं लिहिल्या प्रमाणे संभाषण केलें.

गुजराथ प्रांतांतील अमदाबाद जिल्ह्यांत तालुकदार म्हणून जमीनदार लोक आहेत. वास्तविक म्हटलें असतां ते गिराशे आहेत त्यांचे तालुके धोलके, व बिरंमगांव, व परांतीज व दंदुका या परगण्यांत आहेत. या गिराशियां पैकीं बहुतेक रजपूत आहेत व कांहीं मेवासी म्हणजे कोळी वगैरे आहेत. वंश परंपरेची मालकी असणारे लोक प्राचीन काळीं होते त्यांचे वंशज हे गिराशे आहेत यांविषयीं संशय नाहीं गुजरात प्रांतांत मोंगलांच्या अंमल प्रथम झाला तेव्हां हे गिराशे मोठे सधन होते व त्यांकडे पुष्कळ अधिकार होता मोगल लोकानी त्यां सर्वांस त्यांचे तालुक्यांतून हांकून काढलें परंतु ते मोठे आग्रहाने सामोरे झाल्यामुळें अमदाबाद राजधानीचे जवळचे गिराशे लोकांस त्यांच्या कांहीं जमीनी त्यांस परत द्याव्या लागल्या त्या जमीनी आज दिवस पर्यंत त्यांकडे वसूल माफीने चालत आहेत त्या जमिनीस "वांटयाच्या जमीनी" असें म्हणतात आणि जे गिराशे राजधानी पासून फार दूर होते व जे अधिक लढले त्यांवर खंडणी बसवून त्यांचे संपूर्ण तालुके त्यांस परत दिलें. ही खंडणी वार्षिक होती तीची रकम तालुक्याचे नक्की उत्पन्नाचे निमे होती व ती रोख द्यावी लागत असे. या खंडणी खेरीज त्या तालुक्यांवर इतर कांहीं कर होता याविषयीं कोठे दाखला आढळत नाहीं. या प्रमाणे गिराशीये लोक आपआपले तालुक्याचे मालक व त्याणी सरकारास खंडणी मात्र दिली पाहिजे असें मोंगलानी ठरविलें.

नंतर मराठ्यांचा अंमल झाला तेव्हांही गिराशे लोकांचे वहिवाटींत कांहीं फेरफार झाला नाहीं. वार्षिक ऐवज द्यावयाचा त्यांत मात्र फेरफार झाला. मुलुकगीरी म्हणून नक्की उत्पन्नाचे निमेहून कमी ऐवज कधीं कधीं मराठे घेत होते, तथापि निमेहून ज्यास्ती घेत होते असा दफ्तरांत दाखला आढळत नाहीं.

मराठ्यां कडून गुजराथ प्रांत इंग्रज सरकारांत आल्या नंतर कांहीं दिवस पर्यंत इंग्रज

सरकारानी मागील साला प्रमाणेच वार्षिक ऐवज वसूल केला, परंतु लोकरच त्या ऐवजाच्या प्रकार बदलला. खंडणी होती तीचे बद्दल तो ऐवज जमीनीच्या महसूल म्हणून सरकार समजूं लागलें. हा फेरफार मोठाच आहे, आणि तो लक्षांत ठेवला पाहिजे; कारण त्या मुळें गिराशिये लोकांची स्थिती अगदीच पालटली आहे. या खेरीज आणखी इसवी सन १८२१ सालीं वार्षिक महसूल वाढविला तो शेंकडा ५० टके वाढविला, आणि मोकळेपणे खर्च करण्याची ज्या लोकांस सवई होती आणि खर्चाचा व उत्पन्नाचा अंदाजा करण्यांत जे लोक हुशार नव्हते असे हे जे गिराशे लोक त्यांवर ५० टके वाढविल्यामुळें कराचें ओझें पडलें तें त्यांच्याने सोसवेना असें लौकरच घडून आलें तथापी त्यांस तें ओझें जसें सोसवेल तसें सोसावें लागलें यामुळें ते कर्जाचे पेंचांतआले आणि दरिद्री व मोताद झाले.

पुढें आनरबल् एलफिन्स्टन साहेबानी वार्षिक पट्याची चाल काढली आणि उत्पन्नाचे दर शेंकडा ७० टक्या प्रमाणे आंकडे ठरविले परंतु कोणतेही प्रकारची सूट दिल्यावांचून उत्पन्नाचा असा हा मोठा भाग घेत होते त्यामुळें गिराशे लोकांस निर्वाहा पुरतें देखील राहात नव्हतें हें उघड आहे. आणि पूर्वीचे चुकी मुळें व जरब वहिवाटी मुळें गिराशे लोकांस जे वाईट परिणाम प्राप्त झाले होते त्या परिणामांचा अवरोध झाला नाहीं. यामुळें हे जमीनदार लोक दिवसानुदिवस दरिद्री होत चालले आहेत आणि त्यां पैकीं कित्येक निरुपाय दरिद्रांत बुडाले आहेत आणि त्यांचे तालुके त्यांचे हातांतून गेले आहेत आणि कांहीं इतके खराबीस आले आहेतकीं सरकारचे मोठे चुकीने जी नुकसानी झाली आहे ती दुरुस्त करण्यासाठीं मोठा उपाय करून सरकाराने मदत केल्या वांचून त्यांस पूर्व स्थितीवर आणण्याची आशा नाहीं.

एलफिन्स्टन साहेबांचे कारकीर्दी पासून सरकारानी वारंवार लिगल रिमेंब्रेन्सरसाहेबाचे अनुमता वरून असें ठरविलें आहे कीं गिराशी यांची ह्मणजे तालुकदारांची वहिवाट सरकारची मर्जी आहे तों पर्यंत वंशपरंपरेची पट्टेदारीची आहे.

सदर्हू प्रमाणे भाषण केल्यानंतर प्रेसिडेन्ट साहेबाने सदर्हू हकीकतीचे स्पष्टी करणार्थ सरकारी दफतरांतून खालीं लिहिलेले उतारे वाचले.

सन १८५५ सालीं १२३ नंबराचें लिगल रिमेंबरेन्सर साहेबानी सरकारास पत्र लिहिलें आहे त्यांतील उतारा.

१. तालुकदारी वहिवाट ह्मणजे तालुकदारी पट्यांतील शर्ती खेरीज इतर कांहीं आहे असी गोष्ट नाहीं. तालुकदारांचे व सरकारचे परस्पर हक्काचा निश्चय पट्यांतील शर्ती पाहिल्याने मात्र करतां येतो.

सन १८५५ सालीं ४३ नंबराचें लिगल रिमेंबरेन्सर साहेबानी सरकारास पत्र लिहिलें आहे त्यांतील उतारा.

२. पट्टा नवीन करून घेण्याचा हक्क ह्मणजे आणखी मुदतीचा पट्टा करून घेण्याचा हक्क देशरिवाजा वरून तालुकदारास असेल, परंतु इच्छेस येतील त्या शर्ती पट्यांत दाखल करून पट्टा देण्यास टाळाटाळ करण्याचें सरकारचे हातीं आहे, यास्तव पट्याविषयींचा हक्क कायदेशीर हक्का प्रमाणे अंमलांत आणतां येणार नाहीं हें उघड आहे.

सन १८५५ सालीं १२० नंबराचें लिगल रिमेंबरेन्सर साहेबानी सरकारास पत्र लिहिलें आहे त्यांतील उतारा.

३. पट्यांतील शर्ती सक्त असल्यामुळें गांव जप्त झाला असतां लागलाच पट्टा रद्दकरून व गांव खालसा करून सरकार महसुलाची नुकसानी न होई असें करण्याचें सरकारचे हातीं आहे.

सन१८५५ सालाचा ३४५५ नंबराचा सरकाराचा ठराव.

४. गांवाचा पट्टा कोणास मिळावा याचा निश्चय करण्याचा सरकारचा बेशक हक्क आहे तो न सोडतां या मुकद्दम्यांत सरकार करूं शकतें इत्यादि.

सन१८५५ सालचें १२४ नंबराचें लिगल रिमेंबरेन्सर साहेबानी सरकारास पत्र लिहिलें आहे त्यांतील उतारा.

५. तालुकदारांचे कायदेशीर हक्क त्यांचे पट्टयांत लिहिले आहेत आणि त्या पट्यांतील शर्ती इतक्या सक्त आहेत कीं ते तालुकदार उपरी कुळापेक्षां किंचित् बरे आहेत.

नंतर प्रेसिडेंट साहेब असें ह्मणाले कीं वार्षिक पट्टे वाचून पाहिले असतां ते फारच सक्त आहेत हें दिसून येईल.

हे पुरातन तालुकदार आप आपले तालुक्यांचे वास्तविक मालक होते व मोंगलानीं त्यांचे हक्कावर हल्ला केला तेव्हां हातीं शस्त्र घेऊन मोंगलांबरोबर लढण्याचें त्यांस सामर्थ्य होतें असे हे लोक इंग्रज सरकारचे अव्यवस्थेमुळें ते वार्षिक पटेदार किंवा नुस्ते उपरी कुळासारिखे झाले आहेत आणि अगदीं हलकी स्थिति त्यांस प्राप्त झाली आहे. अव्यवस्था झाली ती चुकीमुळें झाली खरी तथापि मोठा अन्याय झाला आहे तो कमी होत नाहीं.

न्याय ह्मटला ह्मणजे मराठ्यानी अमदाबाद जिल्हा इंग्रज सरकारास दिला त्या वेळीं या तालुकदारांची जी स्थिति होती तशी त्यांची स्थिती होईल तितकी करणें इंग्रज सरकारास अवश्य आहे. या दुर्दैवी गिराशां पैकींच कांहीं गिराशे शेजारचे काठियावाड प्रांतांत आहेत व ते दैवयोगाने भाऊ या गिराशांपासून निराळे आहेत. त्यांची हाल्लीं जशी स्थिति आपले दृष्टीस पडते तशी स्थिति करणें अवश्य आहे.

तदनू प्रमाणे करणें इंग्रज सरकारास अवश्य आहे ही गोष्ट पुष्कळ विचार करून मुंबई सरकारानी आतां कबूल केली आहे. आणि जो उपाय करणें जरूर आहे तो कायदा केल्यावांचून होणार नाहीं अशी सरकारची खात्री झाली आहे. सरकारास जें कारणें अवश्य आहे तें सरकारास बरोबर करतां यावें ह्मणून जे ठराव करण्याचा विचार आहे ते ठराव कौन्सिलांत तयार केलेले मसुद्यांत लिहिले आहेत.

दरिद्र अवस्थेंत आलेले ज्या गिराशिये लोकांचे तालुक्यांच्या बंदोबस्त करण्याचा आतां विचार आहे त्यांचे कर्जदार आहेत ते घरसेळीं खाजगीचे रितीने तोडजोड करण्याचें बोलणें अगदीं कबूल करीत नाहींत. त्यां पैकीं बहुतेकांची मर्जी अशीच आहे कीं त्या रिणी गिराशियांजवळ भिंध्या शिवाय दुसरी कांहीं मालमिळकत राहूं नये, आणि त्या गिराशियानी नादारीचा उपाय केला तरी त्यांची अडचण दूर होत नाहीं. तालुकदारांस कर्जाचे पेंच नसते तर त्यांचे हक्का विषयीं सरकारानी जे चुकून ठराव केले आहेत ते एकदम रद्द करून त्यांस तालुक्यांचे मालक ठरविले असते, आणि त्यांवरील कर कमी केला असता तर सर्व गोष्टींचा निकाल होता परंतु ते हाल्लीं कर्जाचे पेंचांत आहेत आणि त्यांस मालक ठरविले तर त्यांचे तालुक्यांवर दिवानी कोर्टाची हुकुमत हाल्लीं चालत नाहीं ती चालू होऊन त्यांचे तालुके त्यांचे हातून जाऊन विकण्याची सोई त्यांचे कर्जदारांची मात्र होईल, या प्रमाणें तालुकदारांस निराश्रित सरकारास ठेवतां येत नाहीं. सबब भारी व्याजाचे पेंच तालुकदारांस आहेत त्यां विषयीं चौकशी करून खाजगी निकाल करून फडशा करण्यास जितकी मुदत पाहिजे तितके मुदती पर्यंत तालुक्यांवरील व तालुकदारां वरील दिवानी कोर्टाची हुकुमत तहकूब ठेवण्याचा जालीम उपाय ठरविण्यासाठीं कायद्याचा मसुदा कौंसला पुढें

आणावा असा सरकारानी निश्चय केला आहे. वास्तविक जरूरी प्रमाणे जितका जालीम असावा त्याहून अधिक जालीम हाउपाय अगदीं नाहीं असें आनरबल मेंबर कबूल करतील असेंआम्हास वाटतें. आह्मा विषयीं विशेष प्रकारचा अन्याय झाला आहे सबब आमची झालेली नुकसानी विशेष प्रकारचा कायदा ठरवून भरून द्यावी असें मागणें करण्याचा ज्या मनुष्यांचा वास्तविक हक्क आहेअशे मनुष्यांची दाद लागण्यासाठीं एका प्रकारचें न्यानसरी कोर्ट स्थापणे एवढाच याकायद्याचाउद्देश आहे.

तालुकदारांचे मालकीचे जे हक्क सरकारानी आज दिवस पर्यंत नाकबूल केले होते ते त्यांस देण्या विषयीं या मसुद्यांत एक ठराव आहे हेंही तुमच्या लक्ष्यांत येईल. आणि ज्या तालुकदारांची मालकी कबूल करण्यांत येईल त्यांजवरील कराची रकम कमी करण्या विषयीं मसुद्यांत लिहिलें नाहीं तथापि ते कर पुष्कळ कमी करावे असाही सरकारचा इरादा आहे.

सदर्हू प्रमाणे संभाषण करून प्रेसिडेंट साहेब ह्मणाले कीं हा मसुदा आतां पहिले वेळीवाचून सिलेक्ट कमिटी कडे सोंपावा. त्या कमिटींत सरकारचे चीफ सेक्रेटरी किंवा आक्टिंग चीफ सेक्रेटरी व आनरबल वेस्ट्राप साहेब व आनरबल सेट प्रेमा भाई हेमाभाई असावे आणि काम होईल त्या विषयीं त्या कमिटीने आजपासून आठवे दिवशीं रिपोर्ट करावा.

ही गोष्ट सर्वानी कबूल केली.

मग डेपुटी सेक्रेटरी साहेबांनी तो आक्टाचा मसुदा वाचला तो येणे प्रमाणेः—

अमदाबाद जिल्ह्यांतील गिराशिये लोकांची स्थिति पूर्ववत् प्रमाणे करण्याविषयींचे व त्यांस कर्जांतून मुक्त करण्या विषयींचे आक्टाचा मसुदा.

गुजराथ प्रांतांतील अमदाबाद जिल्ह्यांत तालुकदारी गांव आहेत त्यांचे पट्टे सरकारची मर्जी आहे तों पर्यंत मात्र चालतील अशे प्रकारचे आहेत आणि बहुतेक तालुकदारानी आपआपलें तालुके तारण देऊन पैका कर्जाऊ काढला आहे असें सरकारास जाहीर झालें आहे आणि तालुक्याचे पट्टे सदर्हू प्रकारचे असल्यामुळें ते तालुके चांगलें तारण होत नाहींत यास्तव आणि कर्जाची फेड करण्याविषयीं कानूं व कायदे चालू आहेत त्या प्रमाणे व दिवानी कोर्टाचे हुकुमाने तालुकदारांस आपले कर्जांतून मुक्त होतां येत नाहीं त्यांस मुक्त होतां यावें असा बंदोबस्त करणे योग्य आहे.

यास्तव असें ठरविलें आहे कीं मुंबई प्रेसिडेन्सींतील कानू व कायद्यांप्रमाणे कर्ज वसूल होण्यासाठीं जे जे हुकूम दिवानी कोर्टास देण्याचा अधिकार आहे त्यांपैकीं कोणताही हुकूम गुजराथेमधील अमदाबाद जिल्ह्यांत ते तालुकदारी गांव या आक्टास जोडलेले यादींत लिहिले आहेत त्या गावांस सन १८६ चे चे तारिखे पासून वीस वर्षे पर्यंत लागू होणार नाहींत असें समजावें.

आणि असें ठरविलें आहे कीं सदर्हू तालुकदारांचे गांवावरील किंवा गावांचे महसुलावरील दाव्यां बाबद ज्या ज्या फिर्यादी सदर्हू जिल्ह्यांत स्थापलेले कोणतेही दिवानी कोर्टांत किंवा सदर अदालतीचे कोर्टांत चालू असतील त्या सर्व फिर्यादी सन १८६ चे चे तारिखे नंतर निकाल करण्यासाठीं या आक्टांत पुढें सांगितलेले कामाकरितां गवरनर इन् कोन्सिल ज्या अंमलदारास किंवा अंमलदारांस नेमील त्या अंमलदारांकडे पाठवाव्या.

आणि आणखी असें ठरविलें आहे कीं सदरहू तालुकदार सदरहू तालुक्याचे वंशपरंपरेचे वहिवाटदार आहेत वास्तव त्या तालुक्याचे वारशाविषयीं आणि ते गांव कबज्यांत ठेवण्याविषयीं व त्यांची वहिवाट करण्याविषयीं व ते दुसऱ्यांस करून देण्याविषयीं त्यांस मालकीचे संपूर्ण हक्क आहेत-असें सन १८६   चे
चे   तारिखे पासून मुंबई सरकार कबूल करीत आहे. पण त्या गांवांवर गवरनर इन् कौन्सिल जमिनीच्या जो कर ठरवितील तो द्यावा लागेल व या आक्टांतील पुढील ठराव त्या तालुक्यांस लागू होतील.

सदरहू पैकीं कोणतेही तालुक्यांपासून मागील पांच वर्षांत तालुकदारांस सुमारें जी प्राप्ति झाली असेल तिचे दसपटी एवढे किंवा दसपटीहून ज्यास्ती त्या तालुक्यांस कर्ज झालें आहे असें जाहीर होईल तेव्हां त्या तालुक्यांची वहिवाट गवरनर इन् कौन्सिल ज्या अंमलदारास किंवा अंमलदारांस मुद्दाम नेमितील त्यांचे स्वाधीन राहील. आणि तालुकदारांस नफा भाडें व ऐवज मिळावयाच्या तो सर्व सदरहू प्रकारचा अंमलदार किंवा सदरहू प्रकारचे अंमलदार तालुक्यांची वहिवाट करीत असतील तेव्हां त्याणी घ्यावा आणि त्या तालुकदाराचे योग्य निर्वाहासाठीं गवरनर इन् कौन्सिलाचे मतें जितकी रकम जरूर असेल तितकी मात्र त्या तालुकदारास त्याणी दरवर्षास द्यावी.

सदरहू प्रकारचें तालुक्यांचे महसुलाचे वहिवाटी साठीं जे बंदोबस्त व हुकूम सदरहू प्रमाणे नेमलेला किंवा नेमलेले अंमलदार करतील ते सर्व बंदोबस्त व हुकूम त्या तालुक्यांशीं संबंध असणारे मनुष्यानी मान्य केले पाहिजेत आणि तालुकदाराने वास्तवीक जीं कर्जें केलीं असतील त्यांची यादी सदरहू प्रकारचे अंमलदाराने किंवा अंमलदारानी तयार करावी आणि "कर्जाचे पेंचांत आलेले तालुक्यांची वहिवाट करण्यासाठीं कानू" ह्मणून गवरनर इन् कौन्सिलानी केलेल्या कानू अन्वयें त्या कर्जांचा ठराव व फेड करण्याविषयीं बंदोबस्त करावा आणि जरूर असेल त्या प्रमाणे वेळोवेळीं त्या कानूंत वाढविण्याचा व त्यांत फेरफार करण्याचा अधिकार गवरनर इन् कौन्सिलास आहे.

आपले वहिवाटींतील ज्या तालुकदारी तालुक्यांस कर्ज झालें असेल तें फेडण्यासाठीं सदरहू प्रकारचे अंमलदारांस गवरनर इन् कौन्सिलाची मंजुरी घेऊन खालीं लिहिलेले रितीने फंड ह्मणजे भांडवल करण्याचा अधिकार आहे ह्मणजे त्या तालुक्याचे तारणावर कोणी लायक मनुष्य पैका धिरेल त्यास नियमित मुदती पर्यंत त्या गांवांचे कांहीं भागाची वहिवाट देऊन किंवा जरूर वाटेल तितका त्या तालुक्याचा भाग विकून फंड करण्याचा अधिकार आहे परंतु सदरहू दोहों रितीं पैकीं कोणतेही रिती प्रमाणे चालण्यापूर्वीं तालुकदाराचें व त्यास वारसदार असून तो वयांत आलेला असेल तर त्याचें अनुमत प्रथम घेतलें पाहिजे.

प्रत्येक तालुक्यास कर्जांतून मुक्त करण्याविषयींची योजना ठरेल ती सिद्ध झाली ह्मणजे मंजूर होण्यासाठीं गवरनर इन् कौन्सिलाकडे ती लिहून पाठवावी आणि सदरहू प्रमाणे मंजुरी मिळाल्यावर ती योजना दिवानी कोर्टाचे हुकूमनाम्या प्रमाणे अमलांत आणावी· गवरनर इन् कौन्सिलाची मंजुरी मिळाल्यावांचून अमलांत आणूं नये.

असें ठरविलें आहे कीं तालुक्यावरील कर्जें ठरवून त्यांची फेड करण्यासाठीं सदरहू प्रमाणे नेमलेले अंमलदाराचे किंवा अंमलदारांचे ताब्यांत व वहिवाटींत सदरहू प्रकारचे तालुके असतील त्या मुदतींत त्या तालुक्याचे किंवा तालुक्यांचे महसुलाचे तारणावर आपण त्या तालुक्याचा मालक ह्मणून नवीन कर्ज करण्याचा अधिकार किंवा त्या तालुक्याचा कोणताही भाग दुसऱ्यास देण्याचा अधिकार तालुकदारास नाहीं आणि कर्जांचा बंदोबस्त करण्याचे प्रारंभीं प्रत्येक वेळीं सदरहू प्रमाणे जाहीरनामा लावला पाहिजे·

नंतर तारीख १५ वी शनवारचे प्रातःकाळचे ११ वरांपर्यंत कौन्सिलाची सभा तहकूब ह्मणून प्रेसिडेंट साहेबानी ठरविलें.

बमुजिबे हुकूम बंदेगान आलीनवाब मुस्तताब हजरत आनरबल् गवरनर साहेब बाहादूर दर इजलास कौन्सिल.

मुकाम जंजिरे मुंबई,
तारीख ८ माहे मार्च सन १८६२.

लिटलटन् हालीओक बेली साहेब,

डेपुटी सेक्रेटरी निसबत सरकार यांची सही.

(True translation)
VENAYEK WASSOODEW,
Oriental Translator to Government.